# मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र.मनपा/घ.व्य./१९९९/२०२५-२६
दि. १०/०२/२०२६

**आदेश क्र. १**

**अंमलबजावणी दिनांक — १३/०२/२०२६**

विषय :- सखोल स्वच्छता अभियान (Deep Clean Drive).

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ आदत से स्वच्छ भारत (स्वच्छ सवयींचे, स्वच्छ भारत) या उपक्रमांतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये दि. १३/०२/२०२६ रोजी सखोल स्वच्छता अभियान (Deep Clean Drive) आयोजीत करण्यात येत आहे. शहरातील हवा स्वच्छ राहण्यासाठी धुळीकण कमी करणे आणि एकंदरीत संपूर्ण शहरातील मुख्य आणि अंतर्गत रस्ते सखोल पध्दतीने स्वच्छ करुन धुवून घेणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी १५ पथकांची नेमणुक करण्यात येत आहे. पथकामध्ये समाविष्ट असलेल्या अधिका-यांना व कर्मचा-यांना सखोल स्वच्छता मोहिमे अंतर्गत जबाबदारी वाटप करण्यात येत आहे. जोडपत्रामध्ये नमुद केलेल्या बाबींनुसार सर्व नियंत्रण अधिकारी आणि पथक प्रमुख यांनी या मोहिमेमध्ये काम पूर्ण होतील याची दक्षता घ्यावी. शुक्रवार दि. १३/०२/२०२६ रोजी प्रभाग क्र. ०४ व ०६ मध्ये मोहीम राबविण्यात येत असून त्यानंतरच्या प्रत्येक शुक्रवारी इतर प्रभागांमध्ये मोहीम राबविण्यात येणार आहे.

| अ.क्र. | स्वच्छता परिसर / ठिकाणे | पथक क्र. | पथक प्रमुख | नियंत्रण अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १. | योगी नगर ते कोर्ट नाका (महापौर बंगला रस्ता) | पथक क्र.१ | श्री. नितिन खैरे, स्वच्छता निरिक्षक | डॉ. सचिन बांगर, उप-आयुक्त |
| २. | नगररचना ते आई माता मंदिर (पिनाकोला रस्ता) | पथक क्र.२ | श्री. अरविंद चाळके, स्वच्छता अधिकारी | |
| ३. | मा. आयुक्त सो. बंगला ते रामदेव पार्क नाका | पथक क्र.३ | श्री. रविंद्र पाटील, स्वच्छता निरिक्षक | श्रीम. प्रणाली घोंगे, उप-आयुक्त |
| ४. | शिवार गार्डन ते लतीफ पार्क नाका (मुख्य रस्ता) | पथक क्र.४ | श्री. श्याम चौगुले, स्वच्छता निरिक्षक | |
| ५. | अशोका हॉटेल ते टाटा मोटर्स (मुख्य रस्ता) | पथक क्र.५ | श्री. श्रीकांत पराडकर, स्वच्छता निरिक्षक | श्री. दिपक खांबित, शहर अभियंता |
| ६. | एमएमआरडीए रस्ता | पथक क्र.६ | श्री. विनोद जमदाडे, स्वच्छता निरिक्षक | श्री. नितिन मुकणे, कार्यकारी अभियंता (बांधकाम) |
| ७. | टाटा मोटर्स ते काशीमिरा नाका (मुख्य रस्ता) | पथक क्र.७ | श्री. दिपक मोहिते, स्वच्छता निरिक्षक | श्री. दत्तात्रेय वरकुटे, सहा. आयुक्त (प्र.क्र.०३) |
| ८. | लतीफ पार्क ते अशोका हॉटेल (मुख्य रस्ता) | पथक क्र.८ | श्री. रेवनाथ कोळपे, स्वच्छता निरिक्षक (ठेका) | श्री. नरेंद्र चव्हाण, सहा. आयुक्त |
| ९. | हनुमान मंदिर समोर मा. आमदार निवास जैन बंगलो ते जैन हॉस्पीटल ते अमित डेअरी | पथक क्र.९ | श्री. नितिन बर्नवाल, स्वच्छता निरिक्षक | श्रीम. दिपाली जोशी, सहा. आयुक्त |
| १०. | सिल्व्हर पार्क सिग्नल ते बालाजी हॉटेल | पथक क्र.१० | श्री. श्रीकांत धोवर, स्वच्छता निरिक्षक | श्रीम. कविता बोरकर, उप-आयुक्त |
| ११. | बालाजी हॉटेल ते सृष्टी सिग्नल | पथक क्र.११ | श्री. चंद्रकांत भोसले, स्वच्छता निरिक्षक (ठेका) | श्रीम. लॉरेटा घाडगे, सहा. आयुक्त (प्र.क्र.०२) |
| १२. | शिवार गार्डन ते रसाज मॉल | पथक क्र.१२ | श्री. अनिल राठोड, स्वच्छता निरिक्षक | श्री. योगेश गुणिजन, सहा. आयुक्त (प्र.क्र.०१) |
| १३. | छत्रपती शिवाजी महाराज चौक, जे.पी. रोड परिसर | पथक क्र.१३ | श्री. प्रसाद सातोस्कर, स्वच्छता निरिक्षक (ठेका) | श्री. स्वप्निल सावंत, सहा. आयुक्त (प्र.क्र.०४) |

| अ.क्र. | स्वच्छता परिसर / ठिकाणे | पथक क्र. | पथक प्रमुख | नियंत्रण अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १४. | ब्रॅण्ड फॅक्टरी ते डेल्टा गार्डन | पथक क्र.१४ | श्री. कांतीलाल बांगर, स्वच्छता निरिक्षक | श्रीम. प्रियांका भोसले, सहा. आयुक्त (प्र.क्र.०६) |
| १५. | एस.के.स्टोन सिग्नल ते रसाज मॉल | पथक क्र.१५ | श्री. रमेश घरत, स्वच्छता निरिक्षक | श्री. जितेंद्र कांबळे, सहा. आयुक्त (प्र.क्र.०५) |

उपरोक्त पथक प्रमुख व नियंत्रण अधिकारी यांनी दि.२३/०१/२०२६ या दिवशी जोडपत्रा नुसार दिलेल्या परिसरामध्ये नमुद कामे करावी.

**कामाची व्याप्ती :-** उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे शहरातील प्रभाग समिती क्र. ४ व ६ या ठिकाणी प्रत्येक पथकाला कामाचे ठिकाण नमुद करुन देण्यात आलेले आहे. तेवढ्याच क्षेत्रामध्ये सखोल स्वच्छता मोहीम राबविण्याचे आहे.

**कामाची वेळ :-** सकाळी ७.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत

**सहभागी प्रतिनीधी :-** सर्व नियुक्त अधिकारी/ कर्मचारी, सन्मा. नगरसेवक/ नगरसेविका, पत्रकार, महिला बचत गट, अशासकिय संस्था प्रतिनिधी व त्या भागातील राजकीय पक्षाचे प्रतिनीधी प्रमुख सन्माननीय व्यक्ती इ. यांना संबंधित प्रभाग समिती क्र. ४ व ६ यांनी निमंत्रीत करावे.

**कामाची कार्य पध्दती (SOP) :-**

१. सर्व नियंत्रण अधिकारी यांनी सकाळी ७.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत आपल्या अधिनस्त पथकांवर पूर्ण वेळ नियंत्रण ठेवावे. नियंत्रण अधिकारी यांनी संबधित विभागप्रमुख यांचे समवेत बैठक घेऊन आपल्या कार्यक्षेत्रातील आवश्यक त्या कामाचे नियोजन करावे आणि कोणत्या ठिकाणी किती कामगार/ मशिन लावणे आवश्यक आहे याचे सुक्ष्म नियोजन करावे.

२. प्रत्येक पथक प्रमुख यांनी आपल्या अधिनस्त सर्व अधिकारी/ कर्मचारी हजर आहेत याची खात्री करावी आणि सर्व विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून जोडपत्रामध्ये नमुद केलेले सर्व कामे होतील याची दक्षता घ्यावी.

३. सखोल स्वच्छता अभियान सुरु झाल्यानंतर संपूर्ण क्षेत्र नियुक्त कर्मचारी यांचेकडून ब्रशद्वारे, मशीनद्वारे स्वच्छ करुन घ्यावे आणि हे झाल्याची खात्री झाल्यानंतर रस्ते, फुटपाथ, डिव्हायडर यांची स्वच्छता पाण्याद्वारे करुन घ्यावी.

४. सर्व नियुक्त सफाई कामगार गणवेशामध्ये तसेच आवश्यक त्या सुरक्षा उपकरणासह हजर असतील याची खात्री करावी.

५. सखोल स्वच्छता घेण्यात येणाऱ्या क्षेत्रात रस्ते आणि फुटपाथ यावर अनधिकृत फेरीवाले बसणार नाहीत याची दक्षता किमान २ दिवस आधीपासून घेण्यात यावी. यासाठी संबंधित सहा. आयुक्त जबाबदार असतील.

६. सखोल स्वच्छता अभियान राबविण्यात येत असलेल्या दोन्ही वॉर्डमध्ये घनकचऱ्यामध्ये नमुद नसलेले सर्व प्रकारचे साहित्य गोळा करण्यासाठी स्वतंत्र वाहनाची व्यवस्था करण्यात यावी आणि मोहीम संपल्यानंतर त्याची रितसर विल्हेवाट लावण्यात यावी यासाठी घनकचरा व्यवस्थापन विभाग जबाबदार असेल.

७. संपूर्ण मोहीम नमुद केलेल्या वार्ड मधील प्रत्येक मुख्य आणि अंतर्गत रस्त्यामध्ये राबविण्यात यावी.

**प्रसिध्दी :-** श्री. राजकुमार घरत, सिस्टिम मॅनेजर यांनी सदर कामाचे फोटो/ विडीओ काढणे व त्यांची वृत्तपत्रात, सोशल मिडीया मध्ये प्रसिध्दी देणे, सदर मोहिमेसाठी आवश्यक लागणारे साहित्य वस्तु यांचे अहवाल संबधित अधिकारी यांनी संबधित ठेकेदाराकडून प्राप्त करून घेणे याबाबत उचित कार्यवाही करावी. मोहिमे अंतर्गत पूर्वीचे आणि नंतरचे असे जोडफोटो घनकचरा व्यवस्थापन विभाग यांच्याकडे सादर करावेत.

(राधाबिनोद शर्मा, भा.प्र.से)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,

१. संबधित उप-आयुक्त (सर्व)
२. संबधित विभाग प्रमुख / खातेप्रमुख
३. प्रभाग अधिकारी (प्रभाग समिती क्र. १ ते ६)
४. सर्व अधिकारी / कर्मचारी

मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

// जोडपत्र //

| अ.क्र. | करावयाची कारवाई | विभाग | नियंत्रण अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | १. प्रभाग समिती क्र. ४ व ६ परिसरातील सर्व रस्ते, डिव्हायडर, फुटपाथ यांची बॅरीकेड्स व भिंती ब्रशद्वारे सखोल स्वच्छ करुन घेणे.<br>२. रस्त्यावर व मोकळ्या प्लॉटवर पडलेले डेब्रीज उचलणे.<br>३. खुल्या भुखंडावरील कचरा उचलणे व संबंधीत जागा मालकास नोटीस देऊन यापुढे कचरा राहणार नाही याबाबत दक्षता घेणे.<br>४. स्मशानभुमी पाहणी करुन योग्यती स्वच्छता करुन घेणे.<br>५. खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी रस्त्यावर कचऱ्याचे डबे व हात धुण्यासाठी बेसिन ठेवले आहेत. त्यामुळे रस्त्यावर पाणी व कचरा पडून विद्रुपीकरण होत असुन याबाबत दंडात्मक कारवाई करणे व नोटीस देणे.<br>६. सर्व बस स्थानकावरील स्टिकर्स, पोस्टर काढणे.<br>७. शहरातील सर्व स्मारके पुतळे यांची सफाई करणे.<br>८. घराबाहेर धुणी/भांडी केल्यामुळे होणाऱ्या घाणी बाबत ताकीद देणे./जागृती करणे.<br>९. रस्त्यांचे, चौकांचे नावाचे बोर्ड स्वच्छ करुन घेण्यात यावे. त्यावर असणाऱ्या स्टिकर्स, जाहिराती काढुन घेण्यात याव्यात.<br>१०. पान, गुटखा खाऊन थुंकलेल्या फुटपाथ, डिव्हायडर, रस्ते अशा सर्व जागा स्वच्छ करुन घेण्यात याव्या.<br>११. रस्त्यालगत असलेल्या सर्व लिटर बिन्स, ट्विन बिन्स, ट्रिगार्ड स्वच्छ करुन घेण्यात यावे.<br>१२. बस स्टॉपवर लागलेले अनावश्यक स्टिकर्स, थुंकलेल्या जागा स्वच्छ करुन घेण्यात याव्या.<br>१३. पुलावरील कठडे, रेलिंग, जाळ्या, पत्रे यावरील स्टिकर्स आणि थुंकलेले डाग स्वच्छ धुवून घेण्यात यावेत.<br>१४. ज्या ठिकाणी वाहन पार्क केलेले आहेत त्या वाहनाच्या खालील कचरा देखील स्वच्छ करण्यात यावा. | घनकचरा व्यवस्थापन विभाग | डॉ. सचिन बांगर, उप-आयुक्त (घ.व्य.) |
| २ | **वृक्ष प्राधिकरण विभागाने खालील कार्यवाही मोहीम सुरु होण्याच्या आधी पूर्ण करुन घ्यावी.**<br>१५. झाडांच्या बुंध्याशी असलेला कचरा उचलण्यात यावा.<br>१६. आपल्या विभागामार्फत लावण्यात आलेले झाडे असलेली डिव्हायडर यांची पुर्नवापर पाण्याने धुवून घेणे.<br>१७. डीव्हायडर तसेच रस्त्यालगत लावण्यात आलेली झाडूतुन अतिरिक्त माती काढून घेणे जेणेकरुन सदर माती रस्त्यावर पडून नये याची दक्षता घेण्यात यावी.<br>१८. डीव्हायडर तसेच रस्त्यालगत असलेली झाडांची झाटणी मोहीमेपुर्वी करुन घेण्यात यावी.<br>१९. फुटपाथवर छाटणी केलेल्या झाडांचा पाला-पाचोळा व सुकलेल्या झाडांच्या झावळ्या/फांद्या उचलण्यात याव्यात.<br>२०. रस्त्याच्या बाजूला वाढलेली गवत/झुडपे काढण्यात यावी व उचलण्यात याव्यात.<br>२१. रस्ता दुभाजक मधील वाढलेली झाडे छाटणी करणे व उचलण्यात याव्यात.<br>२२. शहरातील सर्व फाऊंटन यांची दुरुस्ती करुन कार्यरत करण्यात यावे.<br>२३. झाडांच्या बुंध्याला थुंकलेले असेल तर ते धुवून चुना मारुन घेणे. | वृक्ष प्राधिकरण विभाग | श्रीम. कविता बोरकर, उप-आयुक्त (उद्यान) |

| अ.क्र. | करावयाची कारवाई | विभाग | नियंत्रण अधिकारी |
|---|---|---|---|
| ३ | **सार्व. बांधकाम विभागाने खालील कार्यवाही मोहीम सुरु होण्याच्या आधी पूर्ण करुन घ्यावी.**<br>२४. गटारावरील झाकणे तुटलेली असल्यास नवीन झाकणे बसविण्यात यावीत.<br>२५. रस्त्यावर खड्डे बुजवणे फुटपाथ कडेला साईड पट्टीला डांबरीकरण करण्यात यावे.<br>२६. इलेक्ट्रीक बोर्ड, डीपी उघडे पडलेले असल्यास ते सुस्थितीत करण्यात यावे.<br>२७. पदपथ/नाल्यावरील स्लॅब/ब्लॉक उखडले असल्यास सुस्थितीत करण्यात यावे.<br>२८. दिशा दर्शक फलक, लेन मार्किग व्यवस्थितीत करणे.<br>२९. चालु कामाचे बॅरेकेडींग केले आहेत त्याची खात्री करणे, डेब्रीज उचलण्यास सांगणे.<br>३०. डिव्हायडर तुट फुट दुरूस्ती करून घेणे.<br>३१. माहिती दर्शविणारे फलक बसविल्याची खात्री करणे.<br>३२. काम पूर्ण झाल्यानंतर डेब्रीज उचलुन घेतल्याची खात्री करणे.<br>३३. बांधकाम साहित्य योग्यरित्या न रचल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही याची खात्री करणे.<br>३४. सर्व रस्त्यावरील खड्डे बांधकाम विभागाने मोहीम सुरु होण्याच्या आधी बुजवून घ्यावेत. | <u>सार्व. बांधकाम /</u><br>विद्युत विभाग | श्री. दिपक खांबीत,<br>शहर अभियंता |
| ४ | **नगर रचना विभागाने खालील कार्यवाही मोहीम सुरु होण्याच्या आधी पूर्ण करुन घ्यावी.**<br>३५. मोकळ्या जागेवर कचरा/मातीचा ढिगारा पडलेला असल्यास संबधित जागा मालक / विकासक यांच्यावर कारवाई करणे.<br>३६. विकासक कामे करत असताना विकासक रस्त्यावरच डेब्रीज, बांधकाम साहित्य ठेवत आहेत कालांतराने ते तसेच पडून रहाते यांच्यावर कारवाई करणे.<br>३७. शहरातील चालु बांधकाम इमारत दुरूस्ती यांना ग्रीन नेट लावणे सक्तीचे करणे.<br>३८. शहरातील बांधकाम व्यावसायिक यांच्या मार्फत शहरातील नाल्यामध्ये गाळ माती सोडण्यात येते यांच्यावर कारवाई करणे.<br>३९. चालु बांधकामाच्या जागेतुन ट्रकची ये जा होते त्या ठिकाणी टायर धुण्याची व्यवस्था करण्यास भाग पाडणे.<br>४०. विकास कामाची माहिती दर्शविणारे फलक लावल्याची खात्री करावी.<br>४१. विकास कामामुळे निर्माण होणाऱ्या धुळीवर नियंत्रणासाठी धुळ नियंत्रण यंत्र बसविल्याची खात्री करावी.<br>४२. विकास काम सुरु असलेल्या ठिकाणी कर्मचाऱ्यांना शौचालयाची सुविधा असल्याची खात्री करावी.<br>४३. मोकळ्या जागेभोवती कुंपण बांधल्या बाबतची खात्री करावी. | <u>नगर रचना विभाग</u> | श्री. पुरुषोत्तम शिंदे,<br>सहायक संचालक<br>(नगररचना) |
| ५ | ४४. रस्त्याकडेला गाय बाधण्यात येतात त्यांच्यावर कारवाई करणे.<br>४५. मोकाट जनावरे बंदोबस्त करणे. | <u>पशु वैद्यकिय विभाग</u> | श्रीम. कविता बोरकर,<br>उप-आयुक्त |
| ६ | **अतिक्रमण विभागाने खालील कार्यवाही मोहीम सुरु होण्याच्या आधी पूर्ण करुन घ्यावी.**<br>४६. रस्त्यांवर बेवारस दुचाकी व चार चाकी वाहने पडलेली आहेत यांच्यावर पोलिसांच्या सहाय्याने कारवाई करणे.<br>४७. इलेक्ट्रीक पोल, झाडांवर व इतर ठिकाणी अनधिकृत बोर्ड, जाहीराती काढण्यात याव्यात.<br>४८. मुख्य चौक फेन्सिंग केलेल्या जागेवर कचरा आणि प्लास्टीकचे आवरण असलेले तंबू बांधण्यात आले असल्यास कारवाई करणे.<br>४९. नो पार्किंग झोन मध्ये अनधिकृतपणे वाहने उभी करण्यात आलेली असल्यास वाहतुक शाखेला कळवुन कारवाई करणे. | <u>अतिक्रमण</u><br>विभाग | श्री. संभाजी पानपट्टे,<br>अतिरिक्त आयुक्त |

| अ.क्र. | करावयाची कारवाई | विभाग | नियंत्रण अधिकारी |
|---|---|---|---|
| | ५०. अनधिकृतपणे रस्त्यावर गॅरेज/ वाहने उभी करण्यात आलेली असुन रहदारीस अडथळा निर्माण होत असुन रस्त्यावर ऑईल व घाण पडून रहाते यांच्यावर कारवाई करण्यात यावी.<br>५१. मनपाने तयार केलेल्या भाजी मार्केट मध्ये फेरीवाले न बसता रस्त्यावर बसतात. यांच्यावर कारवाई करण्यात यावी.<br>५२. पद पथावरील/वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे स्टँडी फलक तसेच इतर साहित्य उचलून घेणे.<br>५३. रस्त्याच्या मधोमध किंवा बाजुला लोंबकळणाऱ्या सर्व वायर, धागे काढुन घेण्यात यावी. | | |
| | **अग्निशमन विभागाने मा. आयुक्त सो. बंगला व काशिमिरा चौक येथे अग्निशमन वाहने उपलब्ध करुन देण्यात यावी.** | <u>अग्निशमन विभाग</u> | डॉ. सचिन बांगर, उप-आयुक्त (अग्निशमन |
| ७ | **शिक्षण विभागाने खालील कार्यवाही मोहीम सुरु होण्याच्या आधी पूर्ण करुन घ्यावी.**<br>५४. शहरातील सर्व शाळा साफसफाई, शौचालय सफाई व आवश्यक बाबींची पुर्तता करणे.<br>५५. शाळेतील सर्व मुलामध्ये कचरा वर्गीकरण व प्लास्टिक बंदी, साफसफाईबाबत जनजागृती करणे.<br>५६. सर्व शाळांमध्ये कचरा वर्गीकरण, प्लास्टीक बंदी, रस्त्यावरील वागणुक संहिता याबाबत व्याख्याने कॉलेज /शाळा स्तरावर आयोजित करणे.<br>५७. शाळेच्या परिसरातील भिंती स्वच्छ करुन घेणे. | <u>शिक्षण विभाग</u> | श्रीम. प्रणाली घोंगे, उप-आयुक्त (शिक्षण) |
| ८ | **पाणीपुरवठा व मलनि:सारण विभागाने खालील कार्यवाही मोहीम सुरु होण्याच्या आधी पूर्ण करुन घ्यावी.**<br>५८. शहरातील भुयारी गटारांवरील मॅनहोल झाकणे सुस्थितीत करणे.<br>५९. मल निसारण केंद्राला भेट देऊन दुर्गंधी येणार नाही याबाबत योग्य ती उपाय योजना करणे.<br>६०. मलनि:सारण केंद्रातील प्रक्रिया केलेल्या पाण्याचा दर्जा व वापर तपासणे.<br>६१. ओव्हर फ्लो होवून रस्त्यावर दुर्गंधी पसरणाऱ्या वाहीनींची दुरुस्ती करुन घेणे.<br>६२. रस्ते सफाई करीता जेट स्प्रे मशिन विभागाकडे असल्यास उपलब्ध करुन देणे.<br>६३. सखोल स्वचछता करीता पुर्नवापर पाण्याची व्यवस्था करणे आणि त्यासाठी आवश्यक तेवढ्या टँकरची सुविधा उपलब्ध करुन घेणे.<br>६४. या मोहिमे अंतर्गत रस्ते, फुटपाथ, डिव्हायडर धुण्यासाठी आवश्यक असलेल्या पाण्याचे नियोजन पाणी पुरवठा व मलनि:सारण विभागाने करावयाचे आहे.एसटीपी प्रकल्पातील पुनर्प्रक्रिया केलेले पाणी या मोहिमेसाठी वापरण्यात यावे. | <u>पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग</u> | श्री. शरद नानेगांवकर, कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) |
| ९ | ६५. NCAP मधील प्राप्त वाहने रस्ते, डिव्हायडर, फुटपाथ धुण्यासाठी व रोडच्या कडेच्या ठिकाणची झाडे पुर्नवापर पाण्याने फवारणी करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, काशिमिरा व छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे उपलब्ध करुन देणे. | <u>पर्यावरण विभाग</u> | श्री. योगेश गुणिजन, सहा. आयुक्त |
| १० | ६६. सर्व अनधिकृत बॅनर / होर्डिंग काढण्यात यावे.<br>६७. प्रभागातील अनधिकृत फेरीवाले यांच्यावर मोहीम सुरु होण्याच्या पुर्वी एक दिवसापर्यंत कार्यवाही करणे. मोहिमे दरम्यान फेरीवाला आणि अतिक्रमण बाबत कारवाई करु नये.<br>६८. रस्त्याच्या कडेला बंद अवस्थेत असलेल्या / भंगार गाडया नोटीस देऊन उचलुन घेणे. | <u>सर्व प्रभाग अधिकारी</u> | प्रभाग अधिकारी (प्रभाग क्र. ०४ व ०६) |